**<u>रे.मु.नं.७६/२०१६ मधील निशाणी क्र.५४ वरील आदेश</u>**

**( CNR : MHAH190022822016 )**

०१. वादीतर्फे दिलेला प्रस्तुचा अर्ज व त्यासोबत असलेले प्रतिज्ञापत्र वाचले. त्यावर प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ५६ अन्वये त्यांनी दिलेले म्हणणे विचारात घेतले.

०२. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करून असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.३ साखरबाई शंकर मोरे या दि. ०४/०४/२०१७ रोजी मयत झाल्या आहे. परंतु, सदरचा मृत्यूचा दाखला वादी यांना वेळेत दाखल करता आला नाही. सदरचा दाखला त्यांना उपलब्ध झाला व त्यामुळे सदरचा मृत्यू दखला अभिलेखावर दाखल करून घेण्यात यावा.

०३. प्रतिवादी यांनी अशी हरकत नोंदविली की, वादीचा सदरचा अर्ज खोटा आहे असुन दाव्याचे कामकाज लांबणीवर पडण्यासाठी उशिरा दाखल केला आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा व वादीकडून प्रतिवादीस रू.५००/- खर्च मिळावा.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादींनी दाव्यात त्यांची कैफियत दाखल केल्यानंतर दि.१८/०३/२०१७ रोजी दाव्यात मुद्दे निघालेले आहेत. सध्या दावा वादी पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.३ साखरबाई हिचे मृत्य प्रमाणपत्र निशाणी क्र. ५९ वर दाखल आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.३ साखरबाई ही दि. ०४/०४/२०१७ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि.२५/१०/२०१७ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे भारतीय मुदत अधिनियम, अर्टिकल १२० अन्वये वादी यांना मयत प्रतिवादी संदर्भात योग्य ती तजवीज करणेकामी ९० दिवसां पेक्षा जास्त विलंब झालेला दिसुन येते. परंतु, हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी संबंधीत पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे आवश्यक आहे. या परिस्थितीत, वादीतर्फे दाखल केलेली कागदपत्रे ही त्यांच्या दाव्याच्या पुराव्याच्या अनुषंगाने आवश्यक आहेत. त्यामुळे वादीस काही खर्च आकारून ती कागदपत्रे न्यायाच्या दृष्टीने अभिलेखावर घेता येवू शकतात. तसेच मयत प्रतिवादी क्र.३ साखरबाई शंकर मोरे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्या संदर्भात व तजवीज संदर्भात झालेला विलंब खर्च रकमेवर मंजूर करणे उचित होईल. यामुळे उपरोक्त परिस्थिती विचारात घेवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**आ दे श**

(०१ ) प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.५४ हा रक्कम एकूण रू.३००/- च्या खर्चावर मंजूर करण्यात येत आहे आणि वादीने खर्चाची रक्कम पुढील तारखे पावेतो अथवा त्यापूर्वी द्यावी.

(०२ ) खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादस दिल्यावरच सदरची कागदपत्रे अभिलेखावर घेण्यात येतील.

(आ. सु. आलेवार)
दि.२५/०२/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
शेवगांव.